# SARTHAK SEVA – SARTHAK SEVA Sanman!








नमस्कार! समाजात एखादा सकारात्मक बदल घडवायला सर्वात महत्वाची ठरते ती म्हणजे एखाद्या व्यक्तीने किंवा अनेकांनी हा चांगला बदल घडवण्यासाठी सातत्याने केलेली कृती, जी नंतर एखाद्या मोठ्या कार्यामधे रुपांतरीत होते. विचारातून कृती व कृतीतून,कार्य, कार्यातून चळवळ व त्यातून घडून आलेला सामाजिक बदल हा एक मोठा प्रवास आहे व तो अनेक खाच खळग्याने व आव्हानाने भरलेला आहे. अनेक चांगल्या व्यक्ती अतिशय उत्तम उद्देश व स्वप्न घेऊन सामाजिक कार्याचा श्रीगणेशा करतात, आत्यंतिक तळमळीने व जिद्दीने एखादा सकारात्मक बदल घडवायचा प्रयत्न करतात. सातत्याने आपले काम पुढे नेतात,यशस्वी होतात. अशा या संघर्षमय दिवसांमधेच खरी गरज असते ती त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहण्याची. त्यांना मदत करण्याची, आर्थिक, व्यावहारीक सल्ला मसलतीची, तज्ञांनी केलेल्या मार्गदर्शनाची आणि केलेल्या कामाच्या प्रशंसेची, पाठीवरच्या शाबासकीची! त्यांनी उत्तरोत्तर प्रगती करावी या करता पुढे केलेल्या मदतीच्या हातांची!

**सार्थक सेवा व सार्थक सेवा सन्मान ह्या पुरस्काराचा खरा उद्देश व स्वरूप हेच आहे. चांगल्या व्यक्तिच्या किंवा संस्थेच्या कामाचा उचित गौरव करणे, त्यांना पुरस्काराच्या निमित्ताने आर्थिक मदत करणे, त्यांचे कार्य अनेकांपर्यंत पोहोचावे या करता प्रयत्न करणे, आपल्या अनुभवांचा व संपर्काचा फायदा त्यांना मिळवून देणे व जिथे आवश्यक तिथे मार्गदर्शन करणे, थोडक्यात म्हणजे, तळमळीने सामाजिक कार्य करणाऱ्याना प्रोत्साहन देऊन त्यांच्या पाठीशी उभे राहणे.एकमेकां सहाय्य करु अवघे धरु सुपंथ! हेच ब्रिद ठेवत चांगल्या माणसांना घेऊन पुढे जाणे व या सर्व प्रवासात चांगल्या व्यक्ति व संस्था याच्याबरोबर जोडले जाणे, हे आमचे अंतिम उद्दिष्ट आहे.**

'सार्थक वेल्फेअर फौंडेशन' हे शाश्वत आणि सकारात्मक सामाजिक बदल आणि विकासासाठी काम करत आहे.

मुलांचा व युवकांचा सर्वांगीण विकास, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण, शारीरिक व मानसिक आरोग्य या माध्यमातून महाराष्ट्रातील अनेक गावें, त्यातील शाळा,गावातील युवक,महिला व विद्यार्थी या बरोबर कार्यरत आहे. संस्थेचे चाळीसहून अधिक कार्यकर्ते व मेंटॉर्स असून त्यामध्ये समुपदेशक, शिक्षक, डॉक्टर,इंजिनिअर अशा अनेकांचा समावेश आहे. **"सार्थक सेवा सन्मान" दरवर्षी मूलभूत सामाजिक समस्यांवर काम करणाऱ्या व सकारात्मक शाश्वत व सकारात्मक बदल घडवून आणणाऱ्या व्यक्तीला किंवा संस्थेला दिला जाणार आहे. पुरस्काराची रक्कम एक लाख रुपये व सन्मानपत्र अशी असेल.या शिवाय विशेष उल्लेखनीय पुरस्कर्त्यांना देखील,आर्थिक मदत, सन्मानपत्र व संस्थेच्या गरजेप्रमाणे आवश्यक मदत व मार्गदर्शन केले जाणार आहे. दरवर्षी ऑगस्ट महिन्यात सार्थक च्या वर्धापन दिनाला हे पुरस्कार जाहीर करण्यात येतील**. आपण योग्य संस्थापर्यंत हि माहिती पोहचवावी व आम्हाला जास्तीत जास्त नामांकने पाठवावीत हि नम्र विनंती.

**मन:पूर्वक धन्यवाद!!**

SARTHAK
WELFARE FOUNDATION

- संस्थेचे / व्यक्तीचे संपूर्ण नाव :
- संपर्क (फोन व ईमेल):
- संस्थेचा पूर्ण पत्ता व पिनकोड :

- संस्थेची वेबसाईट (असल्यास):
- संस्थेची स्थापना व पूर्ण केलेली वर्ष:
- संस्थेचे उद्दिष्ट (Objective-Vision-Mission)
- संस्थेचे कार्यक्षेत्र (category in which organisation is working)
- संस्थेचे लाभार्थी (Direct beneficiaries):

- संस्थेला प्राप्तिकर सवलत आहे का?(80G or any other)
- संस्थेला सरकारी अनुदान प्राप्त होते का ?-असल्यास त्याबद्दल माहिती
- संस्थेची वार्षिक उलाढाल/ जमा खर्च अंदाजे:
- संस्था हा खर्च कसा भागवते?(sources of donation/contribution)

- संस्था/व्यक्ती सिएसआर अंतर्गत प्रकल्प राबवत आहे का?(CSR projects if any) असल्यास कृपया सविस्तर माहिती द्यावी.

- संस्थेने / व्यक्तीने आतापर्यंत केलेल्या कामाचा थोडक्यात गोषवारा व लाभार्थीमध्ये झालेला सकारात्मक बदल/ प्रगती:

- पुढील पाच वर्षातील संस्थेचे ध्येय/ लक्ष्य:
- याआधी मिळालेले पुरस्कार:

- सार्थक कडून कुठच्या प्रकारच्या मदतीची अपेक्षा आहे.

आपली माहिती फॉर्म(Google Form) मध्ये संपूर्ण व सविस्तर भरून सार्थक सेवाच्या ईमेल वरती पाठवावी.

ई-मेल - sarthakfoundation.seva@gmail.com
संपर्क : ८३९०६५००८० , ९७६६०७८१४६, ९८५०७०४७७९
www.sarthakwelfarefoundation.org , www.sarthakmaitra.org